**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संबोधित करणार.**
2. **संसदेत विरोधी पक्षाच्या मागण्या स्वीकारल्या जात नसल्यामुळे संसदीय लोकशाहीचं पालन होत नसल्याची ज्येष्ठ नेते शरद पवार यांची टीका.**
3. **थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी महावितरण तर्फे अभय योजनेला मुदतवाढ.**
4. **उद्या आणि परवा गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात तुरळक पावसाची शक्यता.**

---------------------------------------

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

**ओदिशातल्या भुवनेश्वर इथं आज आणि उद्या होणाऱ्या पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या तीन दिवसीय परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. देशातले वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि सुरक्षा प्रशासकांना राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर संवाद तसंच चर्चेसाठी व्यासपीठ निर्माण करून देणं हा या परिषदेचा प्रमुख हेतू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन कल्पनांना वाव देण्याच्या हेतूनं मुक्त आणि अनौपचारिक चर्चेच्या वातावरणाला प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री कार्यालयानं प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव पी.के.मिश्रा आणि अन्य मान्यवर या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. दहशतवाद तसंच नक्षलवाद, किनारपट्टी सुरक्षा, नवे फौजदारी कायदे आणि अंमली पदार्थ यासह राष्ट्रीय सुरक्षेच्या महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत भर देण्यात येत आहे. प्रधानमंत्री काल संध्याकाळी तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यासाठी भुवनेश्वर इथं दाखल झाले आहेत. उल्लेखनीय सेवेसाठी दिले जाणारे राष्ट्रपती पोलीस पदकही या परिषदेत प्रदान करण्यात येणार आहे.**

---------------------------------------

शरद पवार

संसदेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केलेल्या मागण्या स्वीकारल्या जात नाहीत, याचा अर्थ देशात संसदीय लोकशाहीचं पालन नीट होत नाहीय, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना केली. हे योग्य नसून यासाठी लोकांमध्ये जाऊन जागृती घडवून आणण्याची गरज आहे, असं ते म्हणाले. निवडणुकीच्या निकालानंतर लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता पसरली असून देशात हे प्रथमक घडत असल्याचं पवार म्हणाले. मतदान यंत्राबद्दल काही शंका आहेत, मात्र याबद्दल ठोस पुरावा नाही. काही जणांनी पुनर्मोजणीची मागणी केली आहे, मात्र आपल्याला यातून काही निष्पन्न होईल याची आशा नाही असं पवार यांनी सांगितलं. दरम्यान, विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून आठवडा उलटला तरीही राज्यात सरकार स्थापन झाले नाही. त्यावरून विरोधकांनी महायुतीवर निशाणा साधला आहे. इतकं स्पष्ट बहुमत असताना या राज्यात सरकार बनत नाही. आजच वाचलं आता ५ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. याचा अर्थ लोकांचे बहुमत याला काही महत्त्व नाही. जे काही चाललंय ते राज्यासाठी अशोभनीय आहे असं सांगत शरद पवारांनी टीका केली त्याचसोबत ईव्हीएमवरूनही शंका उपस्थित केली आहे.

-----------------------------------

लसीकरण

सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात यूआयपी अंतर्गत सुमारे ७ कोटी ४३ लाख लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. गरोदर महिलांना तसंच नवजात ते १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना १२ प्रकारच्या रोगांसाठी या कार्यक्रमांतर्गत जीवनरक्षक लस देण्यात येते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. संकेतस्थळावरल्या नोंदीनुसार १ कोटी २६ लाख लसीकरण सत्रं आयोजित करण्यात आली असून सुमारे २७ कोटी ७७ लाख लसीच्या मात्रा देण्यात आल्या आहेत. यूआयपीच्या वार्षिक उद्दिष्टामध्ये सुमारे २ कोटी ९ लाख गर्भवती महिला तसंच २ कोटी ६ लाख अर्भकांचा समावेश आहे, असं पटेल म्हणाल्या. यू विन बद्दल जनजागृती करण्यासाठी मंत्रालयातर्फे व्यापक समाज माध्यम मोहीम देखील राबवण्यात येत आहे.

-----------------------------------

ॲग्रीस्टॅक

भारत सरकारची ॲग्रीस्टॅक संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी या संकेतस्थळाचा www.mhfr.agristack.gov.in याचा वापर करता येईल. या संकेतस्थळावर करावयाच्या कार्यवाहीचे सादरीकरण दिले आहे. त्यानुसार या संकेतस्थळाचा वापर करुन स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक करावा. तसेच शेतकरी ओळख निर्माण करण्याची कार्यवाही मोठया प्रमाणात होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणानी प्रचार व प्रसार करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

-------------------------------------

डॉ.राजेंद्र प्रसाद स्मृती व्याख्यान

सध्याचं जग भारताकडे शांतता दूत म्हणून पाहत असून, भारताचे विचार आणि मतं केवळ ऐकले जात नाही तर त्याचा अनेक कृती आराखड्यांमध्ये स्वीकार केला जातो, असं, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह यांनी म्हटलं आहे. दिल्ली इथं आकाशवाणीच्या प्रतिष्ठीत डॉ. राजेंद्र प्रसाद स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत काल वैश्विक क्षितीजावर भारताची वाढती भूमिका या विषयावर ते बोलत होते. २०४७ पर्यंत देश 'विकसित' होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, आणि भारत ही वाटचाल भविष्यातला दृष्टीकोन बाळगून करत असल्याचं देखील हरिवंश सिंह यांनी म्हटलं आहे.

-------------------------------------

विशेष रेल्वे

महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी आंबेडकरी अनुयायी 06 डिसेंबर रोजी मुंबई ला जाणार आहेत .त्याकरीता बल्लारपूर इथून मुंबई करीता अप-डाऊन विशेष रेल्वे सेवा देण्याची मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी चेअरमन रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वेच्या मुख्य महाप्रबंधक यांना पत्राद्वारे केली आहे.

-------------------------------------

अभय योजना

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना 2024 ला ग्राहकांच्या मागणीनुसार 31 डिसेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा,

असे आवाहन नागपूर महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केलं. राज्यातील महावितरणच्या 31 मार्च 2024 पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी 1 सप्टेंबरपासून अभय योजना सुरू केली होती. योजनेचा कालावधी 30 नोव्हेंबर रोजी संपत असून सदर योजनेस एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. नागपूर परिमंडळातील 7592 वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून हे परिमंडळ पहिल्या क्रमांकावर आहे.

---------------------------------------

फेंगल चक्रीवादळ

गेल्या 24 तासात विदर्भात अकोला इथं सर्वात कमी 12. 7 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. अकोल्या नंतर बुलढाणा येथे 13 अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात तेरा पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान १३ अंश सेल्सिअस ते १४ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान 29. 8 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. एक आणि दोन तारखेलाअर्थात उद्या आणि परवा चंद्रपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, नैऋत्य बंगालच्या उपसागरावरील फेंगल चक्रीवादळ काल मध्यरात्रीपासून ताशी पंधरा किलोमीटर वेगानं वायव्येकडे सरकत आहे. चक्रीवादळ आज रात्री पुद्दुचेरी इथं धडकण्याची शक्यता आहे. सध्याच्या परिस्थितीमुळं किनारी भागातील जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागात राहणाऱ्या लोकांना खबरदारीचा उपाय म्हणून छावण्यांमध्ये हलवण्यात आलं आहे. त्यांना अन्न, निवारा आणि मूलभूत मदत दिली जात आहे.

---------------------------------------

माहिती पुस्तिका

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी इथं होणाऱ्या कार्यक्रमासंबंधी माहिती पुस्तिका तसंच पोस्टरचं अनावरण राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते काल सायंकाळी राजभवनात करण्यात आलं. कार्यक्रमाला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, लेखक तथा माजी खासदार डॉक्टर नरेंद्र जाधव,

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे महासचिव नागसेन कांबळे, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

-----------------------------------------

वाघ हल्ला

चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील निलसनी पेडगाव गावानजीक जंगलात गेलेल्या महिलेवर वाघाने हल्ला करून जागीच ठार केल्याची घटना समोर आली . सदर घटना काल  रात्री घडली. वाघाचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी गावकरी नागरिकांकडून केली जात आहे.

-----------------------------------------

अनामत रक्कम जप्त

विधानसभा निवडणुकीत वैध मतांच्या तुलनेत एक षष्ठअंश मते न मिळालेल्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त केली जाते. दर्यापूर मतदार संघात थेट निवडणूक लढविणाऱ्या एकूण १६ उमेदवारांपैकी १४ जणांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. यात शिंदे शिवसेनेचे कॅप्टन अभिजित अडसूळ यांचाही समावेश असल्याची माहिती निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

-----------------------------------------

रेल्वे तिकिट

रेल्वे आरक्षण ई-तिकिटांच्या अवैध व्यापारावर कडक कारवाई करत नागपूर मंडळाच्या एंटी टाउट टीमने ई-टिकटिंग फसवणुक करणाऱ्या  एका व्यक्तीला अटक केली आहे. ही कारवाई "ऑपरेशन उपलब्ध" अंतर्गत करण्यात आली. या ऑपरेशनमध्ये अवैध टिकिटिंगचा पर्दाफाश करण्यात आला आणि फसवणुकीशी संबंधित महत्त्वपूर्ण पुरावे उघडकीस आले.

****